International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 Jan – Feb 2023

# जगाला विश्वबंधुत्वाची शिकवण देणारे 'स्वामी विवेकानंद'

**डॉ. अपर्णा राहुल उकले**
सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन,हिंगणे खुर्द, पुणे- 411051
*Corresponding Author*- डॉ. अपर्णा राहुल उकले
Email id: aparnaukale@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7584404

**सारांश :**

भारतामध्ये तत्वज्ञ, शिक्षण तज्ञ, समाजसुधारक होऊन गेले. त्यामध्ये महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, महात्मा ज्योतिबा फुले, स्वामी विवेकानंद इत्यादींचे योगदान महत्वाचे आहे. स्वामी विवेकानंदानी भारतातील लोकांबरोबर जगातील लोकांनाही अध्यात्मिक शिकवण दिली. विश्वबंधुत्वाचे शिकवण दिली. त्यांच्या मते, "केवळ भौतिक सुखाचा प्राप्तीमुळे कोणीही सुखी होऊ शकत नाही . त्याला अध्यात्माची जोड मिळाली तरच आपण आपली सर्वांगीण प्रगती करून घेऊ शकतो." स्वामी विवेकानंदांनी सर्व भारतभर व जगभर आपले विचार पोचविण्यासाठी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. त्या मार्फत त्यांनी आपले मौलिक विचार लोकांपर्यंत पोहोचविले. आज आपण स्वामी विवेकानंदांची जयंती 'युवा दिन' म्हणून साजरी करतो. कारण त्यांनी तरुण वर्गांना देखील मार्गदर्शन केलेले आहे.

**प्रस्तावना :**

"तरुणांनो उठा. दुबळेपणाचा त्या करून सामर्थ्यवान बना. आपापसातील भेदभाव विसरून आपले राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बुद्धिवादाचा स्वीकार करा. सामर्थ्याला सत्याची जोड द्या." असा भव्य दिव्य संदेश स्वामी विवेकानंदांनी तरुण पिढीला दिला. सर्व जगाला विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. शिकागोच्या सर्वधर्म परिषदेमध्ये भारताचे नेतृत्व करून हिंदू धर्माची श्रेष्ठता सर्व जगाला पटवून दिली. त्यांनी महिला सबलीकरणाला प्राधान्य दिले. स्त्री शिक्षण नेमके कसे असावे? याबाबत मार्गदर्शन केले. देशातील युवकांना मार्गदर्शन केले.

**स्वामी विवेकानंदांचे बालपण :**

स्वामी विवेकानंद यांचा जन्म 12 जानेवारी 1863 रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्र विश्वनाथ दत्त. त्यांच्या आईचे नाव भुवनेश्वरी. त्यांचे वडील पेशाने वकील होते. स्वामी विवेकानंद यांचे बीएपर्यंतचे शिक्षण कलकत्ता येथे झाले होते. शालेय वयात खरे तर विवेकानंद यांच्यावर पाश्चात्य विचारांचा प्रभाव होता. महाविद्यालयीन जीवनात ते राजा राममोहन राय यांच्या ब्राह्मो समाजाच्या विचाराने प्रभावित झाले होते. मूर्ती पूजा, बहुदेवता वाद, या बाबींवर ब्राह्मो समाजाच्या परंपरेप्रमाणे त्यांचा अजिबात विश्वास नव्हता.

नरेंद्र शाळेत असतानाची गोष्ट. त्यांच्या शाळेतील एका शिक्षकाचा निरोप समारंभ होता. या समारंभाचे अध्यक्ष बंगालमधील ख्यातनाम विद्वान व थोर देशभक्त ईश्वरचंद्र विद्यासागर होते. त्यांच्यासमोर भाषण कोण करणार? हा सर्वात मोठा प्रश्न पडला होता. तेव्हा ही जबाबदारी नरेंद्रवर सोपवण्यात आली. त्याने खरोखरच सुंदर असे भाषण केले. त्याच्या भावमधुर शब्द व ओघवत्या वक्तृत्वाने भारावून जाऊन स्वतः ईश्वरचंद्र यांनी त्यांची पाठ थोपटली व कौतुक केले. अशाच एका समारंभामध्ये नरेंद्रला भजन म्हणण्याची संधी मिळाली. त्यांच्या मधुर भजनाने रामकृष्ण परमहंस भारावून गेले. नरेंद्रला रामकृष्ण यांच्यासारखे गुरु आणि रामकृष्णांना शिष्य मिळाला. योग साधनेच्या मार्गाने मोक्षप्राप्ती होऊ शकते. या रामकृष्णांच्या विचारांचा विवेकानंदांवर प्रभाव पडला. नंतर ते या सिद्ध योगी पुरुषाच्या संपर्कात राहिल्याने त्यांचे विचार पालटले ते कायमचेच. ते सनातन हिंदू धर्म व अद्वैत तत्त्वज्ञान यांचे अजन्म समर्थक बनले.

**स्वामी विवेकानंदांचा प्रवास व अमेरिकेतील भाषण :**

स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण हिंदुस्तान भर प्रवास केला. या प्रवासात त्यांनी मानवी जीवन जवळून बघितले. आपल्या देश बांधवांची स्थिती समजावून घेतली. काही काळ हिमालयात जाऊन त्यांनी योगसाधनाही केली. स्वामीजींनी अनेक पाश्चात्य देशांना भेटी दिल्या. “केवळ भौतिक सुखाच्या प्राप्तीमुळे कोणीही सुखी होऊ शकत नाही. त्याला अध्यात्माची जोड मिळाली तरच आपण आपली सर्वांगीण प्रगती करून घेऊ शकतो”. या त्यांच्या विचारांनी लोकांच्या मनाची पकड घेतली.

11 सप्टेंबर 1893 मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे सर्वधर्म परिषद भरली होती. संपूर्ण जगातून सर्व धर्माचे मान्यवर पंडित या सभेला उपस्थित होते. सर्वांनी हातात भाषणे लिहून आणली होती. स्वामीजींच्या हातात कसलाही कागद नव्हता. भगव्या कपड्यातील प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे स्वामीजी बोलण्यासाठी व्यासपीठावर उभे राहिले. त्यांनी क्षणभर डोळे मिटून आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांचे स्मरण केले आणि बोलू लागले. “अमेरिकेतील माझ्या प्रिय बंधू आणि भगिनींनं ” त्यांच्या या पहिल्या वाक्याला टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सभेतील वातावरण भारावून गेले. या परिषदेत विवेकानंदांनी सनातन वेदांतावर व भारतीय संस्कृतीवर व्याख्यान दिले. सत्याला जाणण्याचे मार्ग आणि धर्म वेगवेगळे आहेत. पण जगातील सर्व धर्माचे सार तत्व एकच आहे असे त्यांनी सांगितले. स्वामीजींनी सर्वांना बंधू- भगिनीच्या नात्याने जोडून घेतले. केवळ विश्वबंधुत्वावर भाषण न करता आपल्या शब्दातून कृतीतून व भावनेतून ते साकार केले. स्वामीजींच्या ओघवत्या पट्टीशैलीतील वक्तृत्वाने हिंदू धर्माची श्रेष्ठता संपूर्ण जगाला पटवून देण्यात ते यशस्वी झाले. त्यांचे हे दोन मिनिटाचे भाषण हा कलाटणी देणारा क्षण होता. या भाषणामुळे त्यांना जागतिक स्तरावर मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर काही काळ अमेरिकेत वास्तव्य केले. तेथे अनेक लोक त्यांचे अनुयायी झाले. मार्गा भगरेट नोबेल या तर भगिनी निवेदिता बनुन भारतात आल्या. स्वामी विवेकानंदांनी पाश्चात्य देशातील भौतिकवादाचा भारतातील अध्यात्म वादाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

**रामकृष्ण मिशनची स्थापना :**

रामकृष्ण परमहंसाच्या निधनानंतर स्वामी विवेकानंदांनी एक मे 1897 रोजी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. धार्मिक आणि शैक्षणिक विचारांचा प्रसार करणे व मानव जातीचे कल्याण करणे हा त्या संस्थेचा प्रमुख उद्देश ठरला. तसेच या मिशनचे कार्य मठ आणि मिशन या विभागाद्वारे चालत असे. मठातून शिक्षक आणि कार्यकर्ते तयार केले जात. तर मिशनचे कार्य समाजाची सेवा करणे हे होते. मठाच्या माध्यमातून शैक्षणिक विचारांचा प्रसार करण्यात येत होता. शिक्षणाच्या प्रसाराकरिता शिशुशाळा, शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली होती. शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची सोय मठामध्ये होती. मठातून नियमितपणे ग्रंथ व नियतकालिके प्रकाशित करण्यात येत होते. मिशनच्या माध्यमातून अपंगांसाठी, दुष्काळग्रस्तांसाठी, अनाथांसाठी व रुग्णांसाठी कार्य केले जात होते. या सर्वांची सेवा करण्यासाठी विविध ठिकाणी अपंगालय रुग्णालय व अनाथालय सुरू केली. रामकृष्ण मिशनचे कार्य आणि धर्मप्रसार हा उद्देश ठेवून विवेकानंद हे भारत भ्रमण करण्यासाठी बाहेर पडले. भारताची धार्मिक उदासीनता पाहून त्यांचे मन खिन्न झाले. त्यानंतर भारतीय तरुण जर अध्यात्मिक बनू शकला तर संपूर्ण परिस्थिती बदलू शकते. असा त्यांना विश्वास होता. तरुणांना मार्गदर्शन, देशसेवा, धर्म जागृती अशी अनेक कार्य त्यांनी स्वीकारले. अत्यंत कमी वयात त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. ‘अद्वैत ब्रह्मज्ञान’ हेच मानवी जीवनाचे अत्यंत शिखर आहे असा संदेश सर्वत्र पोहोचवणे हे एकच उद्दिष्ट स्वामी विवेकानंद यांच्यासमोर होते. ते त्यांनी या मिशनच्या मार्फत पूर्ण केले.

**स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार :**

**1. स्व विकासास प्राधान्य:** विवेकानंदांनी प्रचलित शिक्षण पद्धतीच्या विरोधात जाऊन स्व-विकसन शिक्षणाचा पुरस्कार केला. केवळ पुस्तकी अध्ययनाने काहीही होणार नाही. शिक्षणातून आम्हाला चारित्र्याची जडणघडण होणे, मनाची शक्ती वाढणे, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची शक्ती निर्माण होणे, यासाठी बुद्धिमत्तेचा विकास होणे अपेक्षित आहे. खरा विकास स्वतःच्या स्फूर्तीतून प्राप्त होत असतो. बालकावर कोणत्या प्रकारचे बाह्य दडपण असता कामा नये. स्वातंत्र्य, प्रेम आणि सहानुभूतीच्या वातावरणात बालक त्यांच्यातील धैर्य आणि स्वतःवर अवलंबून राहणे यांचा विकास करते. बालकाला त्याच्या स्वतःच्या स्वानुभावानुसार विकास करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. अशा प्रकारचे शिक्षण मुलांना देणे आवश्यक आहे. शिक्षणाचे ध्येय म्हणजे आत्मविकास होय. म्हणून हा आत्मविकास चारित्र्याच्या विकासाच्या ध्येयाकडे नेतो.

**2.चारित्र्याचा विकास:** चारित्र्याची व्याख्या करताना विवेकानंद म्हणतात, " "कोणत्याही व्यक्तीचे चारित्र्य म्हणजे त्यांच्यातील प्रवृत्तींची आणि मनाच्या कलाची एकूण बेरीज होय." शिक्षणाचे ध्येय चारित्र्य घडण आहे. ते व्यक्तींनी जी आदर्श जोपासली आहेत त्यांच्यावर अवलंबून आहेत. चारित्र्यसंवर्धनासाठी मुलांवर चांगले संस्कार करणे ही पालक व शिक्षकांची जबाबदारी आहे. विविध अनुभवातून विद्यार्थ्यांवर चारित्र्याचे संस्कार करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांनी, पालकांनी आपलेही वर्तन अनुकरणीय ठेवावे. कारण मुले हे पालक आणि शिक्षक यांचे अनुकरण करत असतात. मुलांना आपल्या वर्तनातून, विविध उपक्रमातून चांगल्या सवयी लावल्यास त्यातून उत्तम चारित्र्यसंवर्धन होते.

**3.मनाची एकाग्रता :** मनाची एकाग्रता ही ज्ञानप्राप्तीची गुरुकिल्ली आहे. विवेकानंदांच्या मते, ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर ब्रह्मचर्य व श्रद्धा यांची मदत घेतली पाहिजे. त्यांच्या मते अनेक वर्षे एकाग्रता केल्यानंतरच मनुष्य विद्वान किंवा थोर शास्त्रज्ञ बनू शकतो. म्हणून विवेकानंदांनी 'एकाग्रता' केंद्रभूत करण्यावर भर दिला आहे. एकाग्रतेसाठी त्यांनी चर्चा आणि ध्यानधारणा हे दोन मार्ग सुचविले आहेत. केवळ शिक्षणामध्येच नाही तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मनाची एकाग्रता महत्त्वाची आहे. त्यासाठी शाळेमध्ये रोज दहा ते पंधरा मिनिटे ध्यानधारणा हा उपक्रम घेण्यात यावा. विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीही ध्यानधारणा करणे आवश्यक आहे.

**4. मातृभाषेतून शिक्षण** : मुलांना मातृभाषेतून शिक्षण द्यावे असे त्यांनी सांगितले. कारण मातृभाषेतून दिलेल्या ज्ञानाचे लवकर आकलन होते. विषयातील संकल्पना स्पष्ट होतात. मुलाला समजलेला विषय तो मात्र मातृभाषेतून अधिक चांगल्या पद्धतीने स्पष्ट करू शकतो. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील अंतरक्रिया चांगल्या होतील म्हणून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे. कारण मुल हे मातृभाषेतून आपले विचार अधिक चांगल्या रीतीने मांडू शकतात. तसेच मुलांना मातृभाषेबरोबरच संस्कृत भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कारण ती भाषा 'ज्ञानाचे भांडार' आहे. संस्कृत ही भाषा सर्व भारतीय भाषांचे मूळ स्त्रोत असून परंपरागत ज्ञानाची साठवण त्या भाषेत झालेली आहे. म्हणून प्रत्येक भारतीयाला संस्कृत या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**5. स्त्रियांसाठी शिक्षण:** विवेकानंदांच्या मते, "स्त्री-पुरुष एकाच पक्षाचे दोन पंख आहेत. ते समतोल नसतील तर घर, समाज, राष्ट्र खऱ्या अर्थाने उभेच राहू शकणार नाही." त्यामुळे स्त्री-पुरुषांना समान हक्क मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांमध्ये शिक्षणातून उच्च चरित्र, धैर्य आणि आत्मविश्वास इत्यादीचा विकास होणे आवश्यक आहे. पुरुषांनी प्रत्येक मार्गाने स्त्रियांचा आदर केला पाहिजे. स्त्रियांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांना योग्य शिक्षण दिले पाहिजे. शिक्षणाबरोबरच सर्व हक्क व अधिकार दिले पाहिजे. तरच समाजामध्ये समतोल साधला जाईल व त्यामुळे समाजाची प्रगती जलद गतीने होईल.

**समारोप:**

अशा प्रकारे स्वामी विवेकानंदांनी भारतातील लोकांना आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. सहज सोप्या अध्यात्म संकल्पनेतून त्याचे मानवी जीवनातील महत्त्व विशद केले. तसेच स्व-विकास, मनाची एकाग्रता, चारित्र्यसंवर्धनासाठी शिक्षण, स्त्रियांच्या उद्धारासाठी शिक्षण इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. भारतातच नाही तर पाश्चात्य देशांमध्ये ही त्यांनी विश्वबंधुत्वाची शिकवण दिली . असे हे थोर युगपुरुष चार जुलै 1902 रोजी बेलूर येथील मठामध्ये पंचत्वात विलीन झाले.

**संदर्भसूची**


1. जोशी, प्र. ना.(1999). *14 थोर पुरुषांच्या अद्‌भुत कथा* ( द्वितीय आवृत्ती). मुंबई: मनोरमा.
2. देवधर, स्मी.(2003) . *50 भारतीय क्रांतिवीर.* पुणे: सोनाली.
3. दुनाखे, अ.(2007). *उद्यानमुख भारतीय समाजातील शिक्षण* (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड.
4. निखिल आनंद. स्वा.(2017). *विवेकानंद जीवन चरित्र* (द्वितीय आवृत्ती). नागपूर: लक्ष्मी.